Gram: "Dnyanteerth"

**Swami Ramanand Teerth Marathwada University**

*"Dnyanteerth", Vishnupuri,*

**Nanded – 431 606 (M.S.)**

तारः " ज्ञानतीर्थ "

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ**

*"ज्ञानतीर्थ", विष्णुपूरी,*

नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र)

## :: परिपत्रक ::

या परिपत्रकान्वये सर्व संबधितास कळविण्यात येते की, जून २००३ पासून विज्ञान विद्याशाखे अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम सत्र पध्दतीने सुरु करण्यात आल्याने यापूर्वी सुरु असलेले वर्षनिहाय अभ्यासक्रम**(DA/DB Series)** बंद करण्यात आले. त्यानुसार वर्षनिहाय अभ्यासक्रमानुसार अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तीन संधी देण्यात आलेल्या होत्या, या संधी देवून सूध्दा अनुत्तीर्ण असणा–या विद्यार्थ्यांना, विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन पूर्ण विषयांचे परीक्षा नवीन अभ्यासक्रमानुसार न देता फक्त अनुत्तीर्ण विषयासाठी नवीन अभ्यासक्रमात पर्याय विषय देण्यात आले होते.

वरील प्रमाणे वर्षनिहाय**(DA/DB Series)**अभ्यासक्रमानुसार परीक्षा देणारे अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उपरोक्त प्रमाणे नविन अभ्यासक्रमात पर्याय विषयांची परीक्षा देण्यास संधी उपलब्ध करुन देऊनही अनुत्तीर्ण असणा–या विद्यार्थ्यांना नोव्हेंबर/डिसेंबर २००७ ही एक अंतिम संधी विद्या विभागाचा परिपत्रक क्र.शैक्षणिक/०१/अं.सं/विज्ञान वि.शा./परीक्षा/२००७–०८/६५ दिनांक ३०.०६.२००७ देण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांचे निवेदन/विनंती नुसार मार्च/एप्रिल २००८ ते उन्हाळी २०१० पर्यंत संधी वाढवून दिलेली होती.

आता या संदर्भात दिनांक २६ एप्रिल २०१० रोजी आयोजित मा.विद्या परिषद बैठकीत झालेल्या निर्णयानुसार वर्षनिहाय**(DA/DB Series)** अभ्यासक्रमात अनुत्तीर्ण असणा–या विद्यार्थ्यांना चालू असलेल्या नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे सर्व लेखी व प्रात्याक्षिक परीक्षा देणे अनिवार्य राहील. यापूढे वर्षनिहाय**(DA/DB Series)** जुन्या अभ्यासक्रमाचे परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयाने भरुन पाठवू नयेत व परीक्षा विभाग कोणत्याही सबबीवर ते स्विकारणार नाही, कृपया ही बाब सर्व संबधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

दि.13.04.2005 रोजी झालेल्या मा.विद्या परिषद बैठकतील विषय क्र.31/14-2004 ठरावानुसार नविन अभ्यासक्रमाची परीक्षा सुरु झाल्यानंतर पुढील जास्तीत जास्त केवळ तीन परीक्षा जुन्या अभ्यासक्रमात अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यास मान्यता देण्यात आले. शैक्षणिक वर्ष 2008-2009 पासून विज्ञान विद्याशाखे अंतर्गत एम.एस्सी.अभ्यासक्रमाच्या नविन पाठ्याक्रम सुरु करण्यात आले. त्याप्रमाणे नविन अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्र परीक्षा हिवाळ 2008 मध्ये घेण्यात आली.

उपरोक्त प्रमाणे प्रथम सत्र जून्या अभ्यासक्रमानुसार अनुत्तीर्ण राहिलेल्या विद्यार्थ्यांना नविनअभ्यासक्रम सुरु झाल्यानंतर जून्या अभ्यासक्रमाप्रामणे परीक्षा देण्यास तीन संधी**(उन्हाळी 2009,**

कृपया मागे पहा......

फोन नः 0242 229294 / 229145 / 229543

फक्स नः 02462 229520

Gram: "Dnyanteerth"
**Swami Ramanand Teerth Marathwada University**
*"Dnyanteerth", Vishnupuri,*
**Nanded – 431 606 (M.S.)**

तारः " ज्ञानतीर्थ "
**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ**
*"ज्ञानतीर्थ", विष्णुपुरी,*
नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र)



**हिवाळी 2009 आणि उन्हाळी 2010)** देण्यात आल्यामुळे हिवाळी 2010 परीक्षेपासून प्रथम सत्र जून्या अभ्यासक्रमानुसार अनुत्तीर्ण राहिलेल्या विद्यार्थ्यांना नविन अभ्यासक्रमात समकक्ष विषयाप्रमाणे परीक्षा देणे अनिवार्य राहील. नविन अभ्यासक्रमात समकक्ष विषयाची परिपत्रक लवकरात पाठविण्यात येईल.

प्रथम ते चतुर्थ सत्र जून्या अभ्यासक्रमानुसार अनुत्तीर्ण राहिलेल्या विद्यार्थ्यांना नविन अभ्यासक्रमात समकक्ष विषयाप्रमाणे परीक्षा देण्यासाठी खालील प्रमाणे अंतिम संधी देण्यात येत आहे.

| अ.क. | सत्र | अंतिम संधी | समकक्ष विषयाप्रमाणे परीक्षा देण्यास अमलात येणा-या परीक्षा |
|---|---|---|---|
| 01 | प्रथम सत्र | उन्हाळी 2010 | हिवाळी 2010 |
| 02 | द्वितीय सत्र | हिवाळी 2010 | उन्हाळी 2011 |
| 03 | तृतिय सत्र | उन्हाळी 2011 | हिवाळी 2011 |
| 04 | चतुर्थ सत्र | हिवाळी 2011 | उन्ही 2012 |

तसेच यानंतर जुन्या अभ्यासक्रमाप्रमाणे तीन संधी संपलयानंतर जुन्या अभ्यासक्रमाचे परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयाने/संकुलानी भरुन पाठवू नयेत व परीक्षा विभाग कोणत्याही सबबीवर ते स्विकारणार नाही, कृपया ही बाब सर्व संबधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

'ज्ञानतीर्थ परिसर , नांदेड
विष्णुपुरी, नांदेड

जा.क्र.परीक्षा/विज्ञान/पदव्युत्तर/1274-303
२०१०—२०११ दि. १२—०८—२०१० 13

परीक्षा नियंत्रक

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :

१) मा.प्राचार्य सर्व सलग्नित विज्ञान पदव्युत्तर महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा.संचालक/विभाग प्रमुख सर्व विज्ञान संकुल, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.
४) सहा.कुलसचिव, विज्ञान विद्याशाखा, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

फोन नं: 0242 229294 / 229145 / 229543
फक्स नं: 02462 229520